## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ८०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/१२/२०१६

**१)संगनमत करून लक्ष्मी सहकारी पतसंस्थेमध्ये खातेदाराकाच्या पैशांची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०१/०४/२०१० वा. ते ३१/०३/२०१६ दर. यातील आरोपीतांनी लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. सिल्ली यामध्ये खातेदारकांकडुन रक्कमा जमा करून खातेदारकांनी विश्वासाने ठेवलेल्या रक्कमा त्यांच्या खात्यात जमा न करता लक्ष्मी कृष्णा रियल प्रा.ली. सिल्लीच्या खात्यामध्ये बढत्या करून त्याचा अपहार करून त्यांचा अन्यायाचा विश्वासघात केला त्याच प्रमाणे अभिकर्त्यानी जमा केलेल्या रक्कमा पतसंस्थेच्या खात्यात जमा केल्या नाहीत सुवर्ण तारण योजनेमध्ये ५५३ सुवर्ण धारकांकडुन जमा केलेले ७ किलो ७८६ ग्रॅम ३४९ मिली ग्रॅम सोना कि.२,२३,५९,०१७/—रू चा व खातेधारकांनची रक्कम ५,१०,६८,४६८/—रू आरोपीतांनी खोटे दस्ताएवज तयार करून संगणकीय अभीलेखामध्ये फेरबदल करून खातेधारकांच्या व पतसंस्थेच्या खोटया नोंदनी करून ठेवीदारांच्या आर्थीक आस्थापनामध्ये हितसबंध न जपता खातेदारांची आरोपीतांनी संगमत करून एकुन ७,३४,२७,४८५/—रू ची फसवणुक केल्याने फिर्यादी देवदास रामचद्र अन्नपुरने वय ४८ वर्ष रा. न्यु शिवाजी नगर खातरोड खोकरला भंडारा यांचे लेखा परीक्षण अहवालावरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४०९,२२०४६८,४७१,४७७,३४(अ) भादंवि. सहकलम ३ महाराष्ट्र ठेवीदाराच्या आर्थीक आस्थापना मध्ये असनारा हितसंबध जपनारा कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. इंगोले पोस्टे कारधा हे करीत आहेत.

**२) मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०९/१२/२०१६ रोजी ११.३० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीची बहीन हिला पिण्याकरीता पाणी मागवुन घरात जावुन पलंगावर बसुन हात पकडुन अश्लिल शब्दात बोलुन विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५४(अ)(१)(२),४५२ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांच्या हयगयीमुळे म. रा. वि. वि. कं. मर्या. च्या इलेक्ट्रीक खांबाला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०९/१२/२०१६ रोजी १७.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रक हयगयीने लापरवाीने रिव्हर्स घेवुन म. रा. वि. वि. कं. मर्या. कंपनीचे इलेक्ट्रीक सिमेंट खांबाला मागेहुन धडक मारुन खांबाला तोडुन अंदाजे ६,०००/—रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी नंदकिशोर प्रेमदास शहारे वय २७ वर्ष, रा. साकोली म. रा. वि. वि. कं. मर्या. सहा. अभियंता साकोली यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,४२७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) कब्रस्तानातुन बांबुचे झाडाची चोरी . :—**

दिनांक ०८/१२/२०१६ वा. १६.०० वा. दर. यातील आरोपीने ग्रामपंचायत आष्टी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गट क्र. ५६ कब्रस्तान येथे लावण्यात आलेले विवीध प्रकारचे झाडापैकी पाच बांबुचे झाडे किं ५,०००/—रु. चे तोडुन चोरुन नेल्याने फिर्यादी सरपंच ग्राम पंचायत आष्टी तर्फे सुंदर नारायण गोपाले वय ४५ वर्ष, रा. आष्टी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोस्टे गोबरवाही हे करीत आहेत.

५) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :-

दिनांक ०९/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, कारधा, तुमसर, सिहोरा लाखनी, अडयाळ व मोहाडी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५४ लिटर हातभट्टी दारू +सडवा मोहा+ साहित्य कि. २४,४५०/-रू. व तसेच जुगारातुन कि. २१५/-रू असा एकुण कि. २४,६६५/ -रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.